# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 14/05/2020 (गुरूवार)
(सकाळ)

**अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड**
**एकुण 8,23,320/–रू.चा मुद्देमाल जप्त**
**पोलिस स्टेशन जलालखेडाची कारवाई**

पो.स्टे. जलालाखेडा :– दिनांक 12/05/2020 रोजी पो. स्टे. जलालखेडा येथील ठाणेदार सपोनि श्री दिपक डेकाटे यांना मुखबीर व्दारे गुप्त माहिती मिळाली की, मौजा उमठा पारधीबेडा शिवार येथे एक इसम हा अवैधरीत्या गावठी मोहाफुल, दारूची हातभट्टी गाळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून दिनांक 12/05/2020 चे 18:15 वा. ते 19:30 वा. सुमारास जलालखेडा पोलीसांनी मौजा उमठा बेडा येथे प्रोव्हीशन रेड केली असता आरोपी नामे– जिवन भाऊसाहेब पवार, रा. उमठा बेडा, ता.नरखेड, जि.नागपुर हा उमठा बेड्याजवळ झोपडीजवळ भट्टी लावुन मोहाफुलाची गावठी दारू काढतांना दिसुन आला. पोलीसांना पाहून सदर आरोपीने पळ काढला. घटनास्थळावरून 200 लिटर मोहाफुल दारू कि. 60,000/–रू., 3200 किलो मोहाफुल सडवा कि. 6,00,000/–रू., 5 किलो मोहाफुल कि. 250/–रू. व 1 करिझमा मोटरसायकल कि. 1,50,000/–रू. व इतर साहित्य असा एकुण कि. 8,23,320/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शासनाने साथरोग नियंत्रन व कोविड 19 रोग प्रतीबंधाकरीता शासनाने व मा.जिल्हाधिकारी सा.नागपुर यांनी कलम 144 जा.फौ.प्रमाणे संचारबंदी जाहीर केलेली असतांना आरोपी अवैधरीत्या मोहाफुल दारूची निर्मिती करीत होता.

सदर प्रकरणी पो. स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 65(क) (फ) (ई),69 म.दा.का.,सहकलम 188,269,270भा.द.वी.सहकलम 11 म. कोविंड –19 अधिनियम 2020, सहकलम 51 राष्ट्रीय आपत्ती कायदा 2005 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास सुरू स.पो.नि श्री दिपक डेकाटे 8999686994 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री नागेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पो. स्टे. जलालखेडाचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक श्री. दिपक डेकाटे, पोउपनि श्री. सोनवणे, पोलीस हवालदार

इंगोले, कोल्हे, पोलीस नायक शुक्ला, रोकडे, नासरे, पोलीस शिपाई राठोड, रवि जारंडे, शरद घोरमाडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर